तरुण भारत

शनिवार, २ जुलै २०२२

विवेकानंदमध्ये आंतरराष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील इंग्रजी विभागाने 'क्यूर स्टडीज : स्वरुप, व्याप्ती आणि भविष्य" या विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. बीजभाषक प्रसिध्द लेखिका रुथ वनिता यांनी विवाह संस्थेविषयी मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी समलिंगी व्यक्तीकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोण काय आहे, यासंदर्भात मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे होत्या. शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनीही मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात कलकत्ता येथील प्रसिध्द लेखक कौस्तुव बक्षी यांनी मार्गदर्शन केले. सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठाचे डॉ मंगेश कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. मुंबई विद्यापीठाचे डॉ. सचिन लबडे यांनी भारतीय चित्रपट माध्यमातून समलिंगी व्यक्तींचे चित्रण केलेले दिसून येते, असे सांगितले. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. प्रास्ताविक डॉ. श्रुती जोशी यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. कविता तिवडे व डॉ. प्रभा पाटील यांनी करुन दिली. आभार प्रा. सुप्रिया पाटील यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा. सलमा मणेर व प्रा. माधुरी पवार यांनी केले. यावेळी डॉ. मनिषा पाटील, डॉ. सुनिता वेल्हाळ, डॉ. वाघमारे, प्रा. राजश्री पाटील उपस्थित होते.

A National Webinar on Queer Literature: Nature, Scope and Future

Newspaper: Daily Tarun Bharat
Date: 2nd July, 2022